**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,सांगली**(आपत्ती व्यवस्थापन)

**पत्ता** -विजयनगर, सांगली **फोन** -0233-2600500 E-mail- sanglirdc@gmail.com

---

**वाचले**
1. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
2. आपती व्यवस्थापन अधिनियम 2005
3. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144
4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य-5, दि.13/03/2020, 14/03/2020 तसेच 15/03/2020 रोजीच्या अधिसुचना.
5. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 23 व 24 मार्च 2020.
6. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU /2020/CR.92/DisM-1, दिनांक 30/09/2020 रोजीचे आदेश
7. या कार्यालयाकडील आदेश क्र.गृह-1/कार्या-6/कोरोना/आरआर-894/2020 बंदी आदेश/एसआर-35/2020 दि.01/10/2020
8. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU /2020/CR.92/DisM-1, दिनांक 14/10/2020 रोजीचे आदेश
9. या कार्यालयाकडील आदेश क्र.गृह-1/कार्या-6/कोरोना/आरआर-916/2020 बंदी आदेश/एसआर-38/2020 दि.15/10/2020
10. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 27/03/2021 रोजीचे आदेश
11. या कार्यालयाकडील आदेश क्र.गृह-1/कार्या-6/कोरोना/आरआर-19/2021 बंदी आदेश/एसआर-14/2021 दि.27/02/2021
12. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 04/04/2021 रोजीचे आदेश

---

क्र.गृह.1/कार्या-6/कोरोना/आरआर- 20 /2021 दिनांक:- 05/04/2021
बंदी आदेश/एसआर- 16 /2021

# आदेश

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च 2020 अन्वये कोरोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 मधील तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करणेत आलेले आहे. त्याच प्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील तरतुदी प्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्तीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

आणि ज्याअर्थी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 29/06/2020 रोजीच्या आदेशामध्ये जिल्ह्यातील परिस्थिती प्रमाणे संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत

ज्याअर्थी, राज्य शासनाकडील वाचले क्र. 10 च्या आदेशातील निर्देशानुसार या कार्यालयाकडील वाचले क्र. 11 अन्वये सांगली जिल्ह्यातील लॉकडाऊनची मुदत दिनांक 15/04/2021 रोजीचे 24.00 वा. पर्यंत वाढविणेत आलेली होती. तरी राज्य शासनाकडील वाचले क्र.12 अन्वये वाचले क्र. 6 व 8 आदेशांना दि.30/04/2021 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. तसेच वाढती कोरोना रुग्ण संख्या पाहता काही प्रतिबंध घालणेत आले आहेत. सदर राज्यशासनाचे आदेशाप्रमाणे या कार्यालयाकडील वाचले क्र. 7 व 9 अन्वये पारित केलेल्या आदेशांना दि.30/04/2021 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत मुदतवाढ देवून सदर आदेशाप्रमाणे विविध प्रतिबंध घालणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी डॉ.अभिजीत चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सांगली मला वाचले क्र.1 ते 4 अन्वये प्राप्त झाले अधिकारानुसार राज्य शासनाकडील उपरोक्त वाचले क्र.12 चे आदेशान्वये दिलेल्या निर्देशानुसार या कार्यालयाकडील वाचले क्र. 7 व 9 अन्वये पारित केलेल्या आदेशांना दि.30/4/2021 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत मुदतवाढ देत आहे. तसेच सांगली जिल्ह्यात दि.30/04/2021 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**1. जमाव बंदी व संचार बंदी**

अ. सांगली जिल्ह्यामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 लागू करणेत येत आहे.

ब. सोमवार ते शुक्रवार सकाळी 07.00 ते रात्रीचे 08.00 वाजे पर्यंत 5 पेक्षा जास्त व्यक्तीना कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणेस मनाई असेल.

1. सोमवार ते शुक्रवार रात्रीचे 8.00 वाजलेपासून ते सकाळी 07.00 वाजेपर्यंत, तसेच शुक्रवार रात्री 08.00 वाजलेपासून ते सोमवार सकाळी 07.00 वाजेपर्यंत सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही नागरिकांस वैध कारणाशिवाय फिरण्यास किंवा खालील नमूद कारणास्तव दिलेल्या परवानगीशिवाय फिरता / वावरता (संचारबंदी) येणार नाही.

ड. वैद्यकीय व अत्यावश्यक सेवांना सदर मनाई आदेशातून वगळणेत येत आहे.

इ. अत्यावश्यक सेवा खालील प्रमाणे असतील.

i. रुग्णालये, निदान केंद्रे (Diagnostic Centers), दवाखाने, वैद्यकीय विमा कार्यालये, औषध दुकाने (Pharmacies), औषध कंपन्या, इतर वैद्यकीय आणि आरोग्य सेवा

ii. किराणा, बाजीपाला, दुग्ध पदार्थ, डेअरी, बेकरी, मिठाई, खाद्य दुकाने

iii. सार्वजनिक वाहतूक - रेल्वे, टैक्सी, रिक्षा व सार्वजनिक बसेस

iv. स्थानिक प्राधिकरणांचे मान्सूनपूर्व उपक्रम

v. स्थानिक प्राधिकरणांच्या सर्व सार्वजनिक सेवा

vi. वस्तूंची वाहतूक

vii. शेतीविषयक सेवा

viii. ई - व्यापार

ix. मान्यताप्राप्त माध्यमे

x. गॅस एजन्सी व पेट्रोल - डीझेल पंप

**2. मैदानी / सार्वजनिक ठिकाणच्या क्रिया (Outdoor Activity)**

अ. सर्व सार्वजनिक ठिकाणे ( उदा. बगीचे, मैदाने व इतर ) सोमवार ते शुक्रवार रात्रीचे 8.00 वाजलेपासून ते सकाळी 07.00 वाजेपर्यंत, तसेच शुक्रवार रात्री 08.00 वाजलेपासून ते सोमवार सकाळी 07.00 वाजेपर्यंत बंद राहतील.

ब. सोमवार ते शुक्रवार सकाळी 07.00 वाजलेपासून ते रात्रीचे 8.00 वाजेपर्यंत सार्वजनिक ठिकाणी (उदा. बगीचे, मैदाने व इतर ) भेट देणाऱ्या व्यक्तींनी कोव्हीड - 19 च्या अनुषंगाने देणेत आलेल्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक असेल.

क. स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सार्वजनिक ठिकाणी ( उदा. बगीचे, मैदाने व इतर ) भेट देणाऱ्या व्यक्तींकडून राज्य शासनाने तसेच जिल्हा प्रशासनाने कोव्हीड- 19 च्या अनुषंगाने घालून दिलेल्या निर्देशांचे पालन होत असलेबाबतची तपासणी करावी. स्थानिक स्वराज्य संस्था यांना सदर ठिकाणी नागरिकाकडून कोव्हीड- 19 च्या अनुषंगाने घालून दिलेल्या निर्देशांचे पालन होत नसलेचे निदर्शनास आलेस त्यांनी तात्काळ सदरचे ठिकाण नागरिकांसाठी बंद करावे.

**3. दुकाने, बाजार पेठा व मॉल्स**

अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने, बाजारपेठा व मॉल्स पूर्णपणे बंद राहतील

अ. जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागात भरविले जाणारे सर्व आठवडा बाजार बंद राहतील. जिल्ह्यातील अधिकृत भाजीमंडया सुरु राहतील.

ब. अत्यावश्यक सेवेतील दुकानांमध्ये / आवारामध्ये ग्राहक व विक्रेता यांनी सामाजिक अंतराचे पालन करणे बंधनकारक असेल. जास्तीच्या ग्राहकांना प्रतीक्षेसाठी सामाजिक अंतराचे पालन होईल अशा योग्य पद्धतीने खुणा करून घ्याव्यात.

क. अत्यावश्यक सेवेतील दुकान मालक व कामगार यांनी केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे. सर्व अत्यावश्यक सेवेतील दुकानांनी योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करून घ्याव्यात. उदा. विक्रेता व ग्राहक यांमध्ये पारदर्शक काच किंवा इतर साहित्याचे कवच, इलेक्ट्रॉनिक पेमेंट (Electronic payment) व इतर.

ड. सद्यस्थितीत बंद असणाऱ्या दुकानांच्या दुकान मालक यांनी केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे त्यांच्याकडे काम करीत असणाऱ्या सर्व कामगारांचे लसीकरण करून घ्यावे. तसेच त्यांना पारदर्शक काच किंवा इतर साहित्याचे कवच, इलेक्ट्रॉनिक पेमेंट (Electronic payment) वापरून ग्राहकांशी संवाद साधनेसाठी तयार करावे. जेणेकरून शासनास सदरची दुकाने लवकरात लवकर खुली करता येतील.

**4. सार्वजनिक वाहतूक**

सार्वजनिक वाहतूक खालील प्रमाणे सुरु राहील :

| | |
|---|---|
| रिक्षा | - चालक + 2 प्रवासी |
| टॅक्सी ( 4 चाकी ) | - चालक + RTO नियमाच्या 50 % प्रवासी |
| बस | - RTO नियमाप्रमाणे बैठकीनुसार पूर्ण क्षमतेने. उभे राहून प्रवासास परवानगी नसेल. |

i. सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणाऱ्या व्यक्तींना मास्क चा वापर करणे बंधनकारक असेल. सदर आदेशाचे उल्लंघन केलेस प्रतिव्यक्ती र.रु.500/- इतका दंड आकारला जाईल.

ii. टैक्सी मधून प्रवास करणाऱ्या व्यक्तीने मास्क परिधान केला नसेल तर मास्क परिधान न करणारी व्यक्ती व वाहन चालक यांचेकडून प्रत्येकी र.रु.500/- इतका दंड आकारला जाईल.

iii. प्रत्येक प्रवासानंतर वाहनाचे निर्जंतुकीकरण करणे बंधनकारक असेल.

iv. सर्व सार्वजनिक वाहतूक करणारे वाहन चालक व नागरिकांच्या संपर्कात येणारे कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे व जोपर्यंत लसीकरण करून घेतले जात नाही तोपर्यंत 15 दिवसापर्यंत वैध असेल असा कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) सोबत असणे बंधनकारक असेल. सदरचा नियम दि.10.04.2021 रोजी पासून अंमलात येईल. टैक्सी व रिक्षा चालक यांनी स्वतःला प्रवाशांपासून प्लास्टिक आवरणाने अथवा इतर आवरणाने अलगीकरण करून घेतलेले असेल तर त्यांना सदर नियमातून सुट देणेत येईल.

v. वरील पैकी कोणीही व्यक्ती कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) शिवाय / लसीकरणाशिवाय आढळून आलेस प्रत्येकी र.रु.1000/- इतका दंड आकारणेत येईल.

vi. रेल्वे मध्ये कोणीही उभा राहून प्रवास करणारा प्रवासी नसेल तसेच सर्व प्रवासी यांनी मास्क परिधान केला असलेबाबतची खात्री सबंधित रेल्वे प्राधिकरणाने करावी.

vii. रेल्वे मध्ये मास्क परिधान न करणाऱ्या व्यक्तीकडून प्रत्येकी र.रु.500/- इतका दंड आकारला जाईल.

**5. कार्यालये**

i. खालील कार्यालये वगळता सर्व खाजगी कार्यालये बंद राहतील

अ. सहकारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSU) व खाजगी बँक

ब. Bomby Stock Exchange (BSE) / National Stock Exchange (NSE)

क. विद्युत पुरवठा सबंधित कंपनी

ड. टेलिकॉम (Telicom) सुविधा पुरवणाऱ्या सेवा

इ. विमा / वैद्यकीय हक्क सबंधित सेवा

फ. औषध उत्पादन करण्यासाठी लागणारी त्यांची व्यवस्थापन कार्यालये चालू राहतील.

ii. सर्व शासकीय कार्यालये 50 % क्षमतेने उपस्थितीसह चालू राहतील. परंतु ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर कार्यालय प्रमुख यांनी कोव्हीड- 19 उपाययोजनांचे कामकाज सोपविले आहे, त्यांनी 100 % क्षमतेने कार्यरत राहणेचे आहे.

iii. विद्युत, पाणी, बँकिंग व वित्त सबंधित शासकीय कार्यालये / कंपनी पूर्ण क्षमतेने सुरु राहतील.

iv. शासकीय कार्यालये / कंपनी यांनी आयोजित केलेल्या बैठकीस कार्यालयाबाहेरील व्यक्तींची उपस्थिती आवश्यक असलेस, अशा बैठकी Online आयोजित कराव्यात.

v. अभ्यागतांना शासकीय कार्यालयात / कंपनीत येणेस प्रतिबंध असेल, त्यामुळे शासकीय कार्यालये / कंपनी यांनी e-visitor सेवा तात्काळ सुरु करावी.

vi. अपवादात्मक परिस्थिती मध्ये कार्यालय प्रमुख अभ्यागतांना त्यांचेकडे मागील 48 तासामधील कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) असणेचे अटीवर पास वितरीत करून अभ्यागतांना भेटणेस परवानगी देतील.

vii. सर्व शासकीय व खाजगी कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे.

**6. खाजगी वाहतूक**

खाजगी वाहतूक खाजगी बसेस सहित सोमवार ते शुक्रवार सकाळी 7.00 वाजलेपासून ते रात्री 08.00 वाजेपर्यंत सुरु राहतील. तसेच सोमवार ते शुक्रवार रात्री 08.00 ते सकाळी 07.00 व शुक्रवार रात्री 08.00 वाजलेपासून ते सोमवार सकाळी 07.00 वाजेपर्यंत अतितात्काळ व अत्यावश्यक सेवेसाठीच सुरु राहतील.

i. खाज़गी वाहतूक / खाजगी बसेस RTO नियमाच्या बैठक क्षमतेनुसार सुरु राहतील. उभे राहून प्रवासास परवानगी नसेल.

ii. खाजगी वाहतूक / खाजगी बसेस वाहतूक करणारे वाहन चालक व नागरिकांच्या संपर्कात येणाऱ्या कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे व जोपर्यंत लसीकरण करून घेतले जात नाही तोपर्यंत 15 दिवसापर्यंत वैध असेल असा कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) सोबत असणे बंधनकारक असेल. सदरचा नियम दि.10.04.2021 रोजी पासून अंमलात येईल.

**7. करमणूक**

i. सिनेमा गृहे बंद राहतील

ii. नाट्यगृहे व सभागृहे बंद राहतील.

iii. करमणूक नगरी / आर्केड्स (Arcades) / व्हिडीओ गेम पार्लर बंद राहतील.

iv. जल क्रीडा स्थळे बंद राहतील.

v. क्लब (Clubs), जलतरण तलाव, व्यायामशाळा व क्रीडा संकुले बंद राहतील.

vi. वरील आस्थापनांमधील मालक व कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे लवकरात लवकर लसीकरणकरून घ्यावे.

vii. चित्रपट / मालिका / जाहिरात यांचे छायाचित्रणास खालील प्रमाणे परवानगी असेल.

अ. ज्या चित्रिकरणास मोठ्या संख्येने कलाकार उपस्थिती राहणार असतील असे चित्रिकरण टाळावे.

ब. सदर ठिकाणी काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीजवळ 15 दिवसापर्यंत वैध असेल असा कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) सोबत असणे बंधनकारक असेल. सदरचा नियम दि.10.04.2021 रोजी पासून अंमलात येईल.

क. कलाकार आणि संबंधित कामगार वर्ग यांचेसाठी Quarantine Bubble तयार करणेस आलेस, सदर Quarantine Bubble मध्ये प्रवेश करणेपूर्वी कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report)सादर केलेनंतर स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून अटी व शर्तीवर परवानगी देणेत येईल.

**8. रेस्टॉरंट, बार, हॉटेल**

i. सर्व रेस्टॉरंट व बार पूणर्पणे बंद राहतील.

ii. घेवून जाणे (take away orders), पार्सल आणि घरपोच (Home Delivery) सेवा सोमवार ते शुक्रवार सकाळी 07.00 वाजलेपासून ते रात्री 08.00 वाजेपर्यंत सुरु राहील, तसेच शुक्रवार रात्री 08.00 वाजलेपासून ते सोमवार सकाळी 07.00 वाजेपर्यंत फक्त घरपोच (Home Delivery) सेवा सुरु राहील, सदर कालावधीत कोणत्याही ग्राहकाला रेस्टॉरंट व बार मध्ये प्रत्यक्ष येणे प्रतिबंधित असेल.

iii. हॉटेल्स मधील रेस्टॉरंट व बार हे फक्त निवासी ग्राहकांसाठी सुरु राहील. बाहेरील ग्राहकांना कोणत्याही परिस्थितीत हॉटेल मध्ये प्रवेशास परवानगी नसेल. बाहेरील ग्राहकांसाठी वरील प्रमाणे प्रतिबंध लागू असेल.

iv. घरपोच (Home Delivery) सेवा देणाऱ्या कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे. जोपर्यंत लसीकरण करून घेतले जात नाही तोपर्यंत 15 दिवसापर्यंत वैध असेल असा कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) सोबत असणे बंधनकारक असेल. सदरचा नियम दि.10.04.2021 रोजी पासून अंमलात येईल.

v. सदर कर्मचारी यांनी दि.10.04.2021 पर्यंत वरीलप्रमाणे कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) / लसीकरण करून घेतलेले नसलेस सदर व्यक्तीकडून र.रु.1000/- इतका दंड आकारला जाईल. दंडात्मक कारवाई नंतरही सदर नियमाचे उल्लंघन झालेस केंद्र शासनाकडून जितक्या कालावधीसाठी कोव्हीड - 19 साथरोग हा आपत्ती म्हणून अधिसूचित असेल तितक्या कालावधीसाठी सबंधित आस्थापनेची अनुज्ञप्ती रद्द किंवा सदरचे ठिकाण बंद केले जाईल.

vi. रेस्टॉरंट व बार मध्ये काम करणाऱ्या कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे.

**9. धार्मिक प्रार्थनास्थळे**

अ. सर्व धार्मिक प्रार्थनास्थळे बंद राहतील.

ब. धार्मिक प्रार्थनास्थळांमधील विधिवत पूजेसाठी असणाऱ्या धर्मगुरू अथवा पुजारी यांना वगळून इतर सामान्य नागरिकांना धार्मिक प्रार्थना स्थळांना भेटी देणेस मनाई असेल.

क. धार्मिक प्रार्थनास्थळांमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे.

**10. केशकर्तनालये / स्पा / सलून / ब्युटी पार्लर्स**

अ. केशकर्तनालये / स्पा / सलून / ब्युटी पार्लर्स बंद राहतील.

ब. सदर ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे.

**11. वर्तमानपत्रे**

अ. वर्तमानपत्र छपाईस व वितरणास परवानगी असेल.

ब. सकाळी 07.00 ते रात्री 08.00 पर्यंत घरपोच वर्तमानपत्र वितरण करणेस परवानगी असेल.

क. सदर ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे.

**12. शाळा व महाविद्यालये**

अ. शाळा व महाविद्यालये बंद राहतील.

ब. सदरचा नियम हा 10 वी 12 वी परीक्षेसाठी शिथिल असेल. परीक्षेच्या नियोजनासाठी तसेच परीक्षेसाठी नियुक्त कर्मचारी यांनी लसीकरण केलेले असावे किंवा त्यांचेकडे मागील 48 तासामधील कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र(Negative RT-PCR Test Report) असणे बंधनकारक असेल.

क. महाराष्ट्र राज्याबाहेरील कोणत्याही परिक्षा मंडळ, विद्यापीठ अथवा प्राधिकरणामार्फत सांगली जिल्हयातील विद्यार्थ्यांसाठी घेणेत येणाऱ्या परीक्षांना परवानगी देणेत येत आहे. सबंधित विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयास सदर परीक्षेबाबत पूर्व कल्पना देणे आवश्यक असेल.

ड. सर्व प्रकारची खाजगी कोचिंग क्लासेस बंद राहतील.

इ. सदर ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे.

**13. धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कार्यक्रम**

अ. सर्व धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कार्यक्रम प्रतिबंधित असतील.

ब. ज्या जिल्हयामध्ये निवडणूका प्रस्तावित असतील, त्या ठिकाणी राजकीय सभा / मेळावे घेण्यास खालील अटी व शर्तीस अधीन राहून जिल्हाधिकारी यांचेकडून परवानगी देणेत येईल.

i) भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनूसार संबंधित राजकीय मेळावे / सभा यांना बंदिस्त सभागृहासाठी 50 पेक्षा जास्त नाही किंवा सभागृहाच्या बैठक क्षमतेच्या 50 % चे अधीन राहून आणि खुल्या ठिकाणी 200 पेक्षा जास्त नाही किंवा खुल्या ठिकाणच्या क्षमतेच्या 50 % या पैकी कमी असेल त्या क्षमतेच्या अधिन राहून सर्व कोव्हीड -19 शिष्टाचाराचे पालन केले जाईल, या अटीवर परवानगी देणेत येईल.

i) संबंधित परवानगी देणेत आलेल्या राजकीय सभा / मेळावे संबंधित क्षेत्राचे त्या त्या स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा नेमलेल्या अधिकारी यांचेमार्फत योग्य नियमांचे पालन केले जात असलेची खात्री केली जाईल.

ii) सदर ठिकाणी कोव्हीड -19 शिष्टाचाराचे उल्लंघन झालेस संबंधित ठिकाणचा जागा मालक हा यासाठी जबाबदार राहील आणि आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 नूसार दंडास पात्र राहील. गंभीर प्रकारचे उल्लंघन झाल्यास सदर ठिकाण हे कोव्हीड -19 साथ संपेपर्यत बंद करण्यात येईल.

iii) एखाद्या उमेदवारांच्या दोन पेक्षा जास्त राजकीय सभा आणि मेळाव्यामध्ये सदर बाबींचे उल्लंघन झालेस, पुन्हा सदर उमेदवाराच्या राजकीय सभा / मेळाव्यास परवानगी दिली जाणार नाही.

iv) कोणत्या प्रकारचे मिरवणूका, कोपरा सभा या ठिकाणी कोव्हीड -19 प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

v) वरील सर्व मार्गदर्शक सूचना या निवडणूक प्रक्रियेमध्ये असलेल्या सर्वासाठी समान राहतील. तसेच कोणत्याही प्रकारच्या तक्रारी होणार नाहीत, याविषयी दक्षता घेणे.

क. 50 नातेवाईक/ नागरिकांच्या उपस्थितीत लग्नसमारंभ करणेस परवानगी असेल.

i. सदर ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण केलेले असावे. लसीकरण होईपर्यंत त्यांचेकडे वैध कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) असणे बंधनकारक असेल.

ii. लग्नसमारंभाच्या ठिकाणी एखाद्या कर्मचाऱ्याकडे कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र(Negative RT-PCR Test Report) नसलेस / लसीकरण करून घेतलेले नसलेस सबंधित आस्थापनेवर र.रु.10.000/- इतका दंड आकारणेत येईल.

iii. दंडात्मक कारवाई नंतरही सदर नियमाचे उल्लंघन झालेस केंद्र शासनाकडून जितक्या कालावधीसाठी कोव्हीड - 19 साथरोग हा आपत्ती म्हणून अधिसूचित असेल तितक्या कालावधीसाठी सबंधित आस्थापनेची अनुज्ञप्ती रद्द किंवा सदरचे ठिकाण बंद केले जाईल.

ड. अंत्यसंस्कारासाठी 20 पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येणेस प्रतिबंध असेल. सदर ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कर्मचारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण केलेले असावे आणि त्यांचेकडे वैध कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) असणे बंधनकारक असेल.

**14. रस्त्याच्या कडेला असणारी खाद्य पदार्थ विक्रेते**

i. खाद्य पदार्थ विक्रेते यांनी त्यांचे आस्थापनेच्या ठिकाणी ग्राहकांना प्रत्यक्ष खाणेसाठी देणेस प्रतिबंध असेल. पार्सल अथवा घरपोच सेवेस सकाळी 07.00 ते रात्री 08.00 पर्यंत परवानगी असेल

ii. प्रतीक्षेत असणाऱ्या ग्राहकांना आस्थापनेपासून दूर सामाजिक अंतराचे पालन होईल अशा ठिकाणी उभे राहणेच्या सूचना द्याव्यात.

iii. सदर नियमाचे उल्लंघन झालेस केंद्र शासनाकडून जितक्या कालावधीसाठी कोव्हीड - 19 साथरोग हा आपत्ती म्हणून अधिसूचित असेल तितक्या कालावधीसाठी सबंधित आस्थापना ठिकाण बंद केले जाईल.

vii. सदर ठिकाणी काम करणाऱ्या सर्व व्यक्तीं यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे. जोपर्यंत लसीकरण करून घेतले जात नाही तोपर्यंत 15 दिवसापर्यंत वैध असेल असा कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) सोबत असणे बंधनकारक असेल. सदरचा नियम दि.10.04.2021 रोजी पासून अंमलात येईल.

iv. स्थानिक स्वराज्य संस्था यांनी CCTV द्वारे / वैयक्तिक रीत्या सदर आस्थापनांवर लक्ष ठेवून रहावे. जर एखाद्या आस्थापनाधारक अथवा ग्राहक यांचेकडून नियमांचे उल्लंघन झालेचे निदर्शनास आलेस त्यांचेवर दंडात्मक कारवाई करणेत यावी.

v. स्थानिक स्वराज्य संस्था यांना असे निदर्शनास आले कि सदर आस्थापना वारवार दंडात्मक कारवाई करूनही नियमांचे उल्लंघन करीत आहे. अशा वेळेस केंद्र शासनाकडून जितक्या कालावधीसाठी कोव्हीड - 19 साथरोग हा आपत्ती म्हणून अधिसूचित असेल तितक्या कालावधीसाठी सबंधित आस्थापना ठिकाण बंद करणेत यावे.

**15. उत्पादन क्षेत्र**

i. उत्पादन क्षेत्रास खालील अटी व शर्तीस अधीन राहून परवानगी असेल.

ii. कारखाने व उत्पादन केंद्रामध्ये कामगारांच्या प्रत्येक प्रवेशावेळी शरीराचे तापमान तपासणे बंधनकारक असेल.

iii. सदर ठिकाणी काम करणाऱ्या सर्व व्यक्तीं यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे.

iv. कारखाने व उत्पादन केंद्रामध्ये काम करणाऱ्या कामगार अथवा कर्मचारी यांचा कोरोना चाचणी अहवाल सकारात्मक आलेस. कारखाने व उत्पादन क्षेत्र व्यवस्थापनाने सदर व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस स्वखर्चाने विलगीकरणामध्ये ठेवावे.

v. ज्या कारखाने / उत्पादन केंद्रामध्ये 500 पेक्षा जास्त कामगार/ कर्मचारी काम करीत असतील अशा कारखाने / उत्पादन केंद्र व्यवस्थापनाने स्वतःचे विलगीकरण केंद्र उभे करावे.

vi. जर एखादा कामगार अथवा कर्मचारी यांचा कोरोना चाचणी अहवाल सकारात्मक आला असेल तर सबंधित कारखांने / उत्पादन केंद्राचे पूर्णपणे निर्जंतुकीकरण होईपर्यंत बंद राहील.

vii. गर्दी टाळणेसाठी जेवणाच्या व चहाच्या वेळा टप्प्याटप्प्याने ठेवणेत याव्यात. एकाच ठिकाणी जेवणासाठी एकत्र येवू नये.

viii. सार्वजनिक स्वच्छता गृहाचे वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणेत यावे.

ix. सर्व कामगार / कर्मचारी / व्यक्तीं यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे. जोपर्यंत लसीकरण करून घेतले जात नाही तोपर्यंत 15 दिवसापर्यंत वैध असेल असा कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) सोबत असणे बंधनकारक असेल. सदरचा नियम दि.10.04.2021 रोजी पासून अंमलात येईल.

x. जर एखादा कामगार / कर्मचारी यांचा कोरोना चाचणी अहवाल सकारात्मक आला तर त्यांस कामावरून न काढता त्यांस वैद्यकीय रजा देणेत यावी. सदर कर्मचारी पूर्ण वेतनासाठी पात्र राहतील.

**16. ऑक्सिजन उत्पादक**

अ) कोणताही कारखाना / उत्पादन केंद्र कच्चा माल म्हणून ऑक्सिजन चा वापर करीत असेल तर त्याला दि.10.04.2021 पासून ऑक्सिजन कच्चा माल म्हणून वापरता येणार नाही. जर दि.10.04.2021 नंतर हि एखाद्या कारखाना / उत्पादन केंद्रास वापर सुरु ठेवणेचा असेल तर तो सबंधित अनुज्ञप्ती प्राधिकरणाकडे कारणमीमांसेसह ऑक्सिजन वापराबाबत परवानगी मागेल. सर्व अनुज्ञप्ती प्राधिकरण यांनी ज्या ठिकाणी ऑक्सिजन कच्चा माल म्हणून वापरला जात आहे त्या ठिकाणी दि.10.04.2021 नंतर ऑक्सिजन चा वापर करणे थांबले बाबत तसेच जेथे वापर सुरु आहे त्यांनी परवानगी घेतली असलेबाबत खात्री करावी.

ब) ऑक्सिजनचे उत्पादन करणाऱ्या कारखाना / उत्पादन केंद्र यांनी त्यांचे उत्पादन क्षमतेच्या 80 % उत्पादन हे वैद्यकीय कारणास्तव आरक्षित ठेवावे. सदर ऑक्सिजनचे उत्पादन करणाऱ्या कारखाना / उत्पादन केंद्र यांनी त्यांचे ग्राहक आणि दि.10.04.2021 पासून सदर ग्राहकांना ऑक्सिजन पुरवठा बंद केले बाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.

**17. ई - व्यापार**

अ. सदर आस्थापनांवरील कामगार / कर्मचारी / व्यक्तीं यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे. जोपर्यंत लसीकरण करून घेतले जात नाही तोपर्यंत 15 दिवसापर्यंत वैध असेल असा कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) सोबत असणे बंधनकारक असेल. सदरचा नियम दि.10.04.2021 रोजी पासून अंमलात येईल

ब. वारंवार सदर नियमाचे उल्लंघन झालेस केंद्र शासनाकडून जितक्या कालावधीसाठी कोव्हीड - 19 साथरोग हा आपत्ती म्हणून अधिसूचित असेल तितक्या कालावधीसाठी सबंधित आस्थापनेची अनुज्ञप्ती रद्द केली जाईल.

**18. सहकारी गृहनिर्माण संस्था (Cooperative Housing Societies)**

अ. कोणत्याही सहकारी गृहनिर्माण संस्था (Cooperative Housing Societies) मध्ये 5 पेक्षा जास्त कोरोना बाधित रुग्ण आढळून आलेस सदर सहकारी गृहनिर्माण संस्था (Cooperative Housing Societies) ला सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले जाईल.

ब. अशा संस्थांनी (Societies) संस्थेच्या मेन गेटचे ठिकाणी भेटण्यास येणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर ठिकाणी कोरोना बाधित रुग्ण आढळले बाबत फलक लावावा व त्यांचा प्रवेश निषिद्ध करणेत यावा

क. सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्रास लागू असणाऱ्या सर्व नियमांचे पालन करणे सबंधित संस्थेवर बंधनकारक असेल. (उदा. प्रवेश, पत्ता व इतर यावर परीक्षण ठेवणे)

ड. कोणत्याही संस्थेने सदर नियमांचे उल्लंघन केलेस पहिल्या घटनेवेळी सबंधित संस्थेकडून र.रु.10000/- इतका दंड आकारला जाईल. त्यानंतरही नियमाचे उल्लंघन झालेस स्थानिक प्राधिकरणाने निश्चित केलेला जास्तीत जास्त दंड आकारला जाईल. सदरचा वसूल करणेत आलेला दंड हा संस्थांकडून शासन निर्देशांचे पालन होत असलेबाबत पर्यवेक्षण कामी वापरला जाऊ शकतो.

इ. सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था (Cooperative Housing Societies) यांनी इमारतीमध्ये प्रवेश करणाऱ्या व्यक्तीचे शासकीय नियमानुसार लसीकरण होत नाही तोपर्यंत कोरोना चाचणी अहवाल (RT-PCR Test Report) घ्यावा.

**19. बांधकाम क्रिया (Costruction Activity)**

अ. ज्या बांधकामावर कामगार / कर्मचारी हे बांधकामाच्या ठिकाणी राहणेस आहेत त्या बांधकामांना सुरु ठेवणेस परवानगी असेल. सामानाची ने-आण वगळता बांधकामाचे ठिकाणाहून बाहेरून आत व आतून बाहेर होणारी वाहतूक प्रतिबंधित असेल.

ब. सदर आस्थापनांवरील कामगार / कर्मचारी / व्यक्तीं यांनी केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे. जोपर्यंत लसीकरण करून घेतले जात नाही तोपर्यंत 15 दिवसापर्यंत वैध असेल असा कोरोना चाचणी निगेटिव्ह (Negative) प्रमाणपत्र (Negative RT-PCR Test Report) सोबत असणे बंधनकारक असेल. सदरचा नियम दि.10.04.2021 रोजी पासून अंमलात येईल

क. सदर नियमांचे उल्लंघन केलेस सबंधित बांधकाम विकसकावर (Devloper) यांचेवर पहिल्या घटनेवेळी र.रु.10000/- इतका दंड आकारला जाईल. त्यानंतरही नियमाचे उल्लंघन झालेस केंद्र शासनाकडून जितक्या कालावधीसाठी कोव्हीड - 19 साथरोग हा आपत्ती म्हणून अधिसूचित असेल तितक्या कालावधीसाठी सबंधित बांधकाम बंद करणेत यावे.

ड. जर एखादा कामगार / कर्मचारी यांचा कोरोना चाचणी अहवाल सकारात्मक आला तर त्यांस कामावरून न काढता त्यांस वैद्यकीय रजा देणेत यावी. रजेच्या कालावधीत नियमानुसार पूर्ण वेतनासाठी पात्र राहील.

**20. दंड**

अ. या कार्यालयाकडील आदेश क्र.गृह-1/कार्या-6/कोरोना/आरआर-19/2021 बंदी आदेश/एसआर-14/2021 दि.27.03.2021 अन्वये पारित केलेल्या आदेशामध्ये नमूद दंड या आदेशास अधिक्रमित करील.

ब. वसूल करणेत आलेला सर्व दंड हा सबंधित आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे भरणेत यावा जेणेकरून सदरचा निधी हा कोव्हीड - 19 च्या योग्य प्रतिबंध व उपाययोजनाकामी उपयोगात आणता येईल.

या व्यतिरिक्त यापूर्वी आदेशाने बंदी अथवा सूट देणेत आलेल्या क्रिया / बाबी कायम राहतील.

सूट देणेत आलेल्या आस्थापनांनी, शासनाने त्या - त्या विभागासाठी / आस्थापनांसाठी नेमून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी पोलीस अधीक्षक, Incident Commander तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था व सर्व संबंधित प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी करावी.

सदरचा आदेश सदर आदेश दि.05.04.2021 रोजीचे रात्री 08.00 वाजले पासून ते दि.30.04.2021 रोजीचे रात्री 11.59 वाजेपर्यंत अमलात राहील.

DISTRICT MAGISTRATE जिल्हादंडाधिकारी सांगली SANGLI.

( डॉ.अभिजीत चौधरी )
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सांगली**

**प्रत-**

1. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे यांचेकडे महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी व त्याच्या प्रती पुरविणेसाठी रवाना.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सांगली यांना पुढील कार्यवाहीसाठी
3. पोलिस अधिक्षक, सांगली यांना पुढील कार्यवाहीसाठी
4. आयुक्त, सां.मि.कु.महानगरपालिका, सांगली यांना पुढील कार्यवाहीसाठी
5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सांगली
6. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली
7. सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, सांगली
8. उपविभागीय दंडाधिकारी सर्व यांना पुढील कार्यवाहीसाठी
9. जिल्हा माहिती अधिकारी, सांगली यांना पुढील कार्यवाहीसाठी
10. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी सर्व यांना पुढील कार्यवाहीसाठी
11. सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद / नगरपंचायत यांना पुढील कार्यवाहीसाठी
12. इतर सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख